**ठळक बातम्या**

- ‘गोदा ते नर्मदा जलयात्रेला’ मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत प्रारंभ

- राज्यातल्या भटके-विमुक्त समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी त्रिस्तरीय समित्यांची स्थापना

- केवायसी प्रक्रिया सुलभ करण्यासाठी सर्व वित्तीय नियामकांनी एकत्रितपणे प्रयत्न करावेत, असं केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारमण यांचं आवाहन

**आणि**

- येत्या दोन दिवसांत मध्य आणि पश्चिम महाराष्ट्र तसंच मराठवाड्यात तुरळक ठिकाणी  पाऊस पडण्याची शक्यता तर विदर्भात उष्णतेची लाट येण्याचा हवामान विभागाचा इशारा

**<><><><><>**

पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांच्या ३००व्या जयंतीनिमित्त गोदा ते नर्मदा जलयात्रेला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत आज त्र्यंबकेश्वर इथं प्रारंभ झाला. यावेळी जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे, मंत्री गिरीश महाजन उपस्थित होते. जलसंपदा विभागाने या यात्रेचं आयोजन केलं आहे. ही यात्रा मध्यप्रदेशात महेश्वर पर्यंत जाणार आहे.

अहिल्याबाई होळकर यांनी बारव, तलाव, घाट बांधून जलसंधारणाचं मोठं कार्य केलं, त्यांचा विचार आणि वारसा घेऊन या यात्रा काढल्या आहेत, असं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यावेळी म्हणाले. कुंभमेळ्याच्या काळात गोदावरी नदी निर्मळ वाहायला हवी, त्र्यंबकेश्वर मधे ती बारमाही वाहायला हवी, यासाठी शासन, व्यवस्था करत आहे. हा ‘गोदा ते नर्मदा’ यात्रेचा उपक्रम यशस्वी होईल, आणि

जलसंधारणाची कामं लोकसहभागातून पूर्ण करू, अशी हमी मुख्यमंत्र्यांनी दिली. 'गोदा ते नर्मदा' ही यात्रा लोकजागृती घडवून आणण्यासाठी आहे, असं सांगत नदीजोड प्रकल्पातून महाराष्ट्र दुष्काळमुक्त होईल, याचा पुनरूच्चार मुख्यमंत्र्यांनी केला.

***होल्ड... बाईट- मुख्यमंत्री***

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज त्र्यंबकेश्वर मंदिरात दर्शन घेऊन पूजा केली. पुढल्या वर्षी होणाऱ्या कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर होणाऱ्या विकासकामांबद्दल समाधान व्यक्त करत ही कामं अधिक वेगाने होतील असं त्यांनी वार्ताहरांना सांगितलं. या अनुषंगाने सर्व आखाड्यांच्या महंतांशी चर्चा करणार असून लवकरच यासाठी बैठक घेण्यात येईल, असंही फडणवीस म्हणाले.

या यात्रेच्या दुसऱ्या तुकडीने अहिल्याबाई होळकर यांच्या जन्मस्थानी 'चौंडी' इथून आज यात्रेला सुरुवात केली. यावेळी उप मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, विधानपरिषदेचे सभापती राम शिंदे उपस्थित होते. छत्रपती शिवाजी महाराज यांनी हिंदवी स्वराज्याची ज्योत पेटवली, तर पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांनी स्वराज्याचा विस्तार  केला, असं उपमुख्यमंत्री शिंदे यावेळी म्हणाले.

**<><><><><>**

राज्यातल्या भटके-विमुक्त समाजाच्या समस्या सोडवण्यासाठी तसंच त्यांच्या सर्वांगीण विकासासाठी त्रिस्तरीय समित्यांची स्थापना केल्याची माहिती, इतर मागास बहुजन कल्याण मंत्री अतुल सावे यांनी पत्रकाद्वारे दिली. राज्यस्तर, जिल्हास्तर आणि उपविभाग स्तरावरच्या या समित्यांच्या माध्यमातून भटके-विमुक्तांच्या तक्रारींचं निवारण तातडीने केलं जाईल, त्वरित कारवाई केली जाईल तसंच शासकीय योजनांची प्रभावी अंमलबजावणी केली जाईल असं सावे म्हणाले. या तक्रारींचं निवारण वेळेत व्हावं यासाठी स्पष्ट कार्यपद्धती ठरवण्यात आली आहे. प्राप्त तक्रारींवर १० दिवसांत कार्यवाही सुरू करणं बंधनकारक असेल. उपविभाग

किंवा जिल्हा स्तरावर कार्यवाही न झाल्यास नागरिकांना राज्यस्तरीय समितीकडे दाद मागता येईल, असंही त्यांनी सांगितलं.

**<><><><>**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उद्धव ठाकरे यांची वर्षा बंगल्यावर भेट झाल्याच्या बातम्या पूर्णतः निराधार असल्याचं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज सांगितलं. काही लोक मुद्दाम खोट्या बातम्या पसरवत असून त्यांना नोटिस पाठवू, असंही फडणवीस म्हणाले.

**<><><><>**

छत्रपती शिवाजी महाराजांविषयी धिरेंद्र शास्त्री यांनी कथित अपमानास्पद वक्तव्य केल्याबद्दल शास्त्री यांच्यासह मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, नितीन गडकरी आणि मोहन भागवत यांनीही जाहीर माफी मागावी, अशी मागणी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी केली आहे. ते आज मुंबईत बातमीदारांशी बोलत होते. या सगळ्यांच्या उपस्थितीत धिरेंद्र शास्त्री यांनी छत्रपती शिवाजी महाराज यांच्याबद्दल आक्षेपार्ह विधानं केली, मात्र यांच्यापैकी कुणीही आक्षेप नोंदवला नाही, अशी टीकाही सपकाळ यांनी केली. छत्रपती शिवाजी महाराज हे राज्यकारभाराचा थकवा आल्यामुळे त्यांनी रामदास स्वामी यांच्याकडे राज्यकारभार सोपवला अशा आशयाचं विधान धिरेंद्र शास्त्री यांनी नागपुरात केलं होतं. यावर राज्यभरातून विविध मतं व्यक्त केली जात आहेत.

**<><><><>**

कोणत्याही प्रकल्पांच्या यशस्वी अंमलबजावणीसाठी त्या त्या प्रकल्पांचं उत्तम डिझाईन आणि अधिकाऱ्यांच्या कामगिरीचं मूल्यमापन गरजेचं असल्याचं केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी म्हटलं आहे. आज नागपुरात इंडियन वॉटर वर्क असोसिएशनच्या कार्यक्रमात एका पुस्तकाचं प्रकाशन गडकरी यांच्या हस्ते झालं त्यावेळी ते बोलत होते. प्रकल्पांसाठी कोणतीही निविदा

काढण्यापूर्वी विस्तृत प्रकल्प अहवालाचा सखोल अभ्यास करण्याचे आवाहनही त्यांनी बांधकाम आणि अभियांत्रिकी क्षेत्रातल्या अधिकाऱ्यांना केले. खाजगी क्षेत्रासोबतच्या भागिदारीतून प्रकल्प नफ्यात आणणं गरजेचं असल्याचं मतही त्यांनी व्यक्त केलं.

<><><><><>

केवायसी प्रक्रिया सुलभ करण्यासाठी आणि नागरिकांना वारंवार केवायसी करावं लागू नये यासाठी देशातल्या सर्व वित्तीय नियामकांनी एकत्रितपणे प्रयत्न करावेत, असं आवाहन केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारमण यांनी आज केलं. सेबीच्या स्थापना दिनानिमित्त मुंबईत आयोजित कार्यक्रमात त्या बोलत होत्या. देशातला एखादा शेअर बाजार, शेअर दलाल किंवा संबंधितांवर सायबर हल्ला झाला, तर त्यामुळे होणारं नुकसान भरून यायला मोठा काळ जाऊ शकतो. त्यामुळे सायबर हल्ले, कृत्रिम बुद्धिमत्तेमुळे निर्माण झालेल्या आव्हानांचा सामना करण्यासाठी सेबीनं मजबूत यंत्रणा तयार करावी, अशी सूचना त्यांनी केली. सीमेपलीकडून होणाऱ्या गैरव्यवहारांचा सामना करण्यासाठी आंतरराष्ट्रीय पातळीवरच्या नियामकांशी संपर्क वाढवावा, असंही सीतारमण यांनी सांगितलं. गुंतवणूकदारांमध्ये जागृती करण्यासाठीच्या सेबीच्या अभियानाचा प्रारंभ यावेळी अर्थमंत्र्यांनी केला. देशातले सर्व शेअर बाजार, म्युच्युअल फंड संघटना आणि इतर संस्थांच्या मदतीनं हे अभियान राबवलं जाणार आहे.

<><><><><>

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी उद्या सकाळी ११ वाजता 'मन की बात' या कार्यक्रमातून देशवासीयांशी संवाद साधतील. हा या कार्यक्रमाचा १३३ वा भाग असून त्याचं थेट प्रसारण आकाशवाणी आणि दूरदर्शनच्या सर्व वाहिन्यांवर, एआयआर न्यूज या संकेतस्थळावर आणि न्यूज ऑन एअर मोबाईल ॲपवर केलं जाणार आहे. त्याचप्रमाणे AIR न्यूज, डीडी न्यूज तसंच प्रधानमंत्री कार्यालय आणि

माहिती आणि प्रसारण मंत्रालयाच्या यूट्यूब वाहिन्यांवरून हा कार्यक्रम थेट प्रक्षेपित होईल.

**<><><><><>**

आयपीएल टी ट्वेंटी क्रिकेट स्पर्धेत आज दिल्ली इथं पंजाब किंग्ज आणि दिल्ली कॅपीटल्स यांच्यात सामना सुरु आहे. या सामन्यात दिल्लीनं पंजाबसमोर विजयासाठी २६५ धावांचं आव्हान ठेवलं आहे. नाणेफेक जिंकून पहिली फलंदाजी करताना दिल्लीनं के.एल. राहूल याची नाबाद दीडशतकी तर नितीश राणा यांच्या ९१ धावांच्या खेळीच्या जोरावर २० षटकांत २ बाद २६४ धावा केल्या.

शेवटचं वृत्त हाती आलं तेव्हा विजयासाठी २६५ धावांचा पाठलाग करताना, पंजाबच्या १३ षटकात ३ बाद १७७ धावा झाल्या होत्या. स्पर्धेत आता थोड्याच वेळात जयपूर इथं राजस्थान रॉयल्स आणि सनरायजर्स हैद्राबाद यांच्यातल्या सामन्यालाही सुरुवात होईल. या सामन्यात सनरायजर्स हैदराबदच्या संघानं नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षण करायचा निर्णय घेतला आहे.

**<><><><><>**

येत्या दोन दिवसांत विदर्भातल्या तुरळक ठिकाणी उष्णतेची लाट येईल, असा इशारा हवामान खात्यानं दिला आहे. कोकण आणि मुंबईतल्या काही भागात आज आणि उद्या हवामान उष्ण आणि दमट राहील, असा अंदाज आहे. मध्य महाराष्ट्रात तुरळक ठिकाणी पाऊस पडेल तर तुरळक ठिकाणी मेघगर्जनेसह विजांचा कडकडाट होईल आणि सोसाट्याचा वारा वाहील, अशी शक्यता आहे. पश्चिम महाराष्ट्रातल्या काही भागासह पुणे, सातारा, कोल्हापूर, सोलापूर इथं विजांच्या कडकडाटासह हलका ते मध्यम स्वरूपाचा पाऊस पडेल आणि ताशी ३० ते ४० किलोमीटर वेगानं वारे वाहतील.

**//<><><><><>//**